# प्रेस नोट

## अपहरण व खंडणी तसेच जबरी चोरीतील आरोपीस गुन्हे शाखा,युनिट-५ पुणे शहर कडुन जेरबंद.

दि.१७/१०/२०१८ रोजी दुपारी १४.०० वाजण्याचे सुमारास हडपसर रेल्वे स्टेशन रोडवर मुंढवा पुणे येथील रोडवरुन फिर्यादी नामे-मनोज राजकुमार केवरामानी वय-३९ रा.रहाटणी पुणे हे त्यांचे कार्यालयातील जमा झालेली रोख ७,१५,०००/- रु. हे कोरेगाव पार्क येथील सेवा विकास बॅकेत भरणेकरीता त्यांचा कामगार नामे- शैलेश रणपिसे याचेसह त्यांचे ॲक्टीव्हा मोपेडवरुन जात असताना काळया रंगाच्या मोटार सायकल वरुन आलेल्या दोन अनोळखी इसमांनी फिर्यादी यांना कोयत्याचा धाक दाखवुन त्याचे पाठीला लावलेली काळे रंगाची सॅक बॅग जबरदस्तीने घेवुन पळुन गेले होते. त्यावरुन मुंढवा पो.स्टे.गु.र.नं.२८०/२०१८ भा.दं.वि.कलम-३९२,३४ हा गुन्हा दाखल झाला आहे. तसेच काही दिवसापुर्वी पुणे शहरात पाळत ठेवुन, कोयत्याचा धाक दाखवुन लुटमार करणारे व खडक पो.स्टे.कडील अपहरण व खंडणीचे गुन्हयातील आरोपी हे गुन्हा घडलेपासुन वेगवेगळया ठिकाणी लपुन राहुन गुन्हे करीत होते. त्यांचा गुन्हे शाखा युनिट-५ व खडक पोलीस स्टेशकडील पोलीस स्टाफ हे सर्वत्र शोध घेत होते.

दिनांक २९/१०/२०१८ रोजी पो.हवा.अमजद पठाण यांना त्यांचे खास बातमीदारामार्फत माहिती मिळाली की, दाखल गुन्हे आरोपी नामे-सुयश राजु वाघमारे व त्याचे साथीदार यांनी केलेले असुन तो सुयश राजु वाघमारे हा पुणे सोलापुर रोड येथे त्याचे नातेवाईकांना भेटण्याकरीता येणार आहे अशी खात्रीशीर माहिती मिळाली. सदरचे बातमीप्रमाणे लावुन आण्णासाहेब मगर हॉस्पीटल आवार परीसर हडपसर पुणे येथे सापळा रचुन आरोपी नामे- सुयश राजु वाघमारे वय-२५ वर्षे धंदा-वडा पाव हातगाडी रा.८२४ भवानी पेठ,पुणे व कोकरे बिल्डींग,पहिला मजला,पालखी विसावा कमाणी शेजारी,वडकीनाला ता.हवेली जि.पुणे यास शिताफीने ताब्यात घेणेत आले.

सदर आरोपीकडे सखोल व कौशल्यपुर्वक तपास करता त्याने दि.१७/१०/२०१८ रोजी दुपारी १४.०० वाजण्याचे सुमारास हडपसर रेल्वे स्टेशन रोडवर मुंढवा पुणे येथील रोडवरुन यातील फिर्यादी व त्यांचा कामगार ॲक्टीव्हा मोपेडवरुन जात असतांना मी व माझा साथीदार नामे शहाबाज फिरोज खान रा.चुडामण तालीमीजवळ, भवानी पेठ, पुणे असे दोघेजण आमचा इतर गुन्हयातील साथीदार नामे-फरदिन याची शाईन मोटार सायकल नंबर एम.एच.-१२/ एन.जी.-११६० हीचेवरुन त्याचे पाठीमागे जावुन नमुद ॲक्टीव्हा चालविण्या-या इसमास शहाबाज याने कोयत्याचा धाक दाखवुन त्याचे पाठीमागे बसलेल्या इसमास पण कोयत्याचा धाक दाखवुन त्याचे पाठीला लावलेली काळी रंगाची सॅक बॅग आम्ही जबरदस्तीने घेवुन पळुन गेले होते. त्याबाबत मुंढवा पो.स्टे.गु.र.नं.२८०/२०१८ भा.दं.वि.कलम-३९२,३४ हा गुन्हा दाखल आहे.

दिनांक ६/१०/२०१८ रोजी दुपारचे वेळी यातील अटक आरोपी सुयश राजु वाघमारे व त्याचा साथीदार नामे शहाबाज असे दोघांनी मिळुन हरकानगर,भवानी पेठ पुणे येथुन मुलगा नामे-दर्शन वय-२७ वर्षे हा यास मुददाम ठोस देवुन पाडुन,अपहरण करुन त्याचे वडीलांचे मोबाईलवरुन २० कोटी रुपयांची खंडणी मागितली होती. परंतु पोलीस आल्याने सदर मुलास सोडुन तेथुन पळुन गेले होते. सदर बाबत खडक पोलीस स्टेशन गु.रजि.नं.३३८/२०१८ भादविक-३६४(अ),३८७,३४. प्रमाणे गुन्हा दाखल असल्याचे दिसुन आले आहे.

दि.१३/१०/२०१८ रोजी सायंकाळपासुन ॲक्टीवा मोपेडवरुन काळया रंगाची सॅक बॅग घेवुन कलेक्शन करीत जात असलेले फिर्यादी हे नाना पेठेत एका सोसायटीमध्ये गेला असता लिफ्टजवळ यातील अटक आरोपी यांनी फिर्यादीस कोयत्याचा धाक दाखवुन त्याचे जवळील सॅक बॅगसह जबरदस्तीने सुमारे २ लाख रोख रुपये चोरी केले होते त्यावरुन समर्थ पोलीस स्टेशन गु.रजि.नं. १९९/२०१८ भादविक.-३९२,३४ प्रमाणे गुन्हा दाखल आहे. यातील अटक आरोपी नामे- सुयश वाघमारे व त्याचा साथीदार नामे शहाबाज फिरोज खान असे दोघांनी मिळुन वरील नमुद तीन गुन्हे केल्याचे तपासात निष्पन्न झाले आहे. दाखल गुन्हयाचा तपास युनिट-५ कडील स.पो.निरी.भालचंद्र ढवळे हे करीत आहेत.

**सदरची कारवाई ही मा.सहा.पोलीस आयुक्त गुन्हे-२ पुणे शहर, श्री. भानुप्रताप बर्गे यांचे मार्गदर्शनांखाली युनिट-५ चे प्रभारी अधिकारी,श्री. दत्ता चव्हाण, सपो.निरी. भालचंद्र ढवळे, सपो.निरी.संतोष तासगांवकर, सपोफौज लक्ष्मण शिंदे, अजय जाधव, पो.हवा.प्रविण शिंदे,राजेश रणसिंग,सचिन घोलप,समीर शेख,अमजद पठाण, केरबा गलांडे, प्रदीप सुर्वे, पो.ना.प्रमोद घाडगे, दयानंद शेगर, प्रमोद गायकवाड, प्रविण काळभोर, अंकुश जोगदंडे,अशोक शेलार, संजयकुमार दळवी, खडक पोलीस स्टेशन कडील सपो.निरी.वैभव पवार, पो.शि.रवी लोखंडे,आशिष चव्हाण, प्रमोद नेवसे,विशाल जाधव, महावीर दावणे,बंटी कांबळे,राकेश क्षिरसागर,समीर माळवदकर यांनी ही कामगिरी केलेली आहे.**